# - प्रकरण पहिले -

## - भारतीय शेतमजूर -

भारतीय समाजव्यवस्थेत शेतमजूराना कोणतेच स्थान नाही. विकास कार्यक्रमातून ग्रामीण भागात आलेल्या सुबत्तेत त्याना त्यांचा वाटा मिळालेला नाही. मजुरांच्यातही शेतमजूर कमी दर्जाचे मानले जातात. त्यांना भूतकाळ नाही, वर्तमानकाळात त्याना स्थान नाही तर भविष्य काळात पूर्ण अंधार आहे. त्याना मिळणारा रोजगार अनियमित असतो, मजुरीचा दर अल्प राहातो त्यामुळे शेतमजूर दरिद्री,कर्जबाजारी असणे स्वाभाविक आहे. त्यांच्या कष्टाला तसेच शोषणाला अंत नाही. ते देशभर विखुरलेले असल्यामुळे त्यांची एकूण संख्या मोठी असली तरी ते संघटीत नाहीत. अन्यायाविरुध्द ते आवाज उठवू शकत नाहीत. फार काय - नियोजनातही त्याना स्थान नाही. सामाजिकदृष्टया दुर्लक्षित असलेल्या या घटकाचा अभ्यास करुन त्यांच्या आर्थिकस्थितीबद्दल काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न या सर्वेक्षणातून केलेला आहे.

शेतमजूर कोणाला म्हणावयाचे याची व्याख्या करणे अनेक कारणामुळे अवघड आहे. शेतीत काम करणारे सर्वजण मजुरीवर काम करीत नाहीत. काही शेतकरी काही प्रमाणात आपल्या स्वतःच्या - शेतावर, तर काही प्रमाणात दुस-याच्या शेतावर मजुरीने काम करीत असतात; काही शेतकरी जमीन मालकाकडून कसावयास घेतलेल्या जमिनीवर काही प्रमाणात तर दुस-याच्या शेतीवर मोलाने काही प्रमाणात काम करतात. काहीजण एकाच जमीन मालकाकडे सातत्याने काम करतात तर काहीजण स्वतंत्र राहून ज्या शेतक-याकडे काम असेल तेथे असेल तेव्हा काम करतात. काही मजूर मजुरी पैशात घेतात, काही वस्तूत स्वीकारतात तर काहीजणांची मजुरी काही भाग पैशात तर काही भाग वस्तूत असते.

यापैकी निश्चितपणे कोणाला शेतमजूर म्हणून संबोधता येईल हे ठरविणे अवघड आहे. काहीजण तर हंगामात शेतीवर तर इतर कालावधीत - बिगरशेतीत काम करीत असतात.

शेतमजुरांची व्याख्या ठरविणे इतके अवघड असले तरी १९५०-५१ साली नेमलेल्या पहिल्या शेतमजूर पहाणी मंडळाने अशी व्याख्या केली आहे. " एकूण कामाच्या दिवसापैकी ५० टक्के किंवा जास्त दिवस शेतीवर मोलाने काम करणारा शेतमजूर होय " यामुळे शेतीवर काम करून रोजंदारी मिळविणाऱ्या अल्पभूधारक, कारागीर यांचासुध्दा समावेश शेतमजुरात होतो. या समितीच्या म्हणण्याप्रमाणे ज्या कुटुंबाचा प्रमुख शेतमजूर आहे किंवा कुटुंबातील कमावत्या व्यक्तिपैकी ५० टक्के किंवा जास्त व्यक्ति शेतमजुराच्या वरील व्याख्येत मोडत असतील तर ते शेतमजूर कुटुंब होय.

१९५६ मध्ये नेमलेल्या दुसऱ्या शेतमजूर पहाणी मंडळाने शेतमजूरही संज्ञा स्पष्ट करताना " गुरे पाळणे, दुग्धव्यवसाय,कुक्कुटपालन,वराहपालन या कार्यांचा शेती कार्यात समावेश केला." त्यांच्या व्याख्येप्रमाणे - " ज्या व्यक्तिच्या एकूण उत्पन्नपैकी ५० टक्के अथवा जास्त उत्पन्न दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करून मिळविलेले असते ती व्यक्ति शेतमजूर होय " म्हणजे पहिल्या समितीने स्वीकारलेल्या कार्याच्या कसोटी ऐवजी दुसऱ्या समितीने उत्पन्नाची कसोटी स्वीकारली. व ती शास्त्रीयदृष्टया जास्त योग्य होती. तरीसुध्दा या व्याख्येप्रमाणे कोणतीही व्यक्ति शेतमजूर आहे किंवानाही हे ठरविण्यात विविध अडचणी येतात. राष्ट्रीय मजूर पहाणी मंडळाच्या व्याख्येप्रमाणे " दुसऱ्याच्या जमिनीवर काम करून मजुरीच्या स्वरूपात एकूण उत्पन्नपैकी ५० टक्के किंवा जास्त उत्पन्न मिळविणारी व्यक्ति शेतमजूर होय "

अभ्यासाच्यादृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून शेतमजुरांचे वर्गीकरण पहिल्या शेतमजूर पहाणी मंडळाने दोन प्रकारात केले आहे.

१) कायम शेतमजूर :

एकाच जमीन मालकाकडे कायम किंवा वार्षिक बोलीवर काम करणारे श्रमिक या प्रकारात येतात. याना मिळणारा रोजगार कायमचा व नियमीत असतो. यापैकी बहुतेक शेतमजूर वेठबिगार या सदरात मोडतात. श्री.वैंकय्या यानी आंध्रप्रदेशातील काही जिल्हयात केलेल्या पहाणीवरुन असे आढळून आले आहे की कायम रोजगार पुरविणारी व स्थिर उत्पन्न देणारी ही रोजगारी सोडून अनेक शेतमजूर दैनिक रोजगारी स्वीकारतात. कारण आता अनेक गावातून अथवा पंचक्रोशीतून बिगरशेती रोजगार उपलब्ध होत आहे. व यामुळे वेठबिगारीतून सुटका होते.

२) दैनिक शेतमजूर :

कोणाच्याही शेतावर कामाच्या उपलब्धतेप्रमाणे काम करणारे व रोजगार मिळविणारे श्रमिक म्हणजे दैनिक शेतमजूर होत. त्यांची मजुरी दररोज अथवा साप्ताहिक पध्दतीने दिली जाते. अशा शेतमजुरांची तीन विभागात विभागणी केलेली आहे.

अ) अल्पभूधारक शेतमजूर :

अशा शेतक-यांची स्वत:ची थोडी जमीन असते पण निर्वाहाच्या दृष्टीने ती अपुरी असल्यामुळे शेतकरी स्वत: व त्याच्या कुटुंबातील व्यक्ति शेतावर काम करतात.

.... ४/-

ब) खंडकरी शेतमजूर :

काही शेतकरी जमीन मालकाकडून खंडाने कसण्यासाठी जमीन घेतात पण निर्वाहासाठी या जमिनीपासून येणारे उत्पन्न अपुरे असल्यामुळे स्वत: व कुटुंबातील व्यक्ति दुस-याच्या शेतावर मोलाने काम करतात. - मजुरीपासून मिळणारे उत्पन्नच त्यांच्या निर्वाहाचे प्रमुख साधन असते.

क) भूहीन शेतमजूर :

स्वत:ची मुळीच जमीन नसणा-या व्यक्ति दुस-याच्या शेतावर कामाच्या उपलब्धतेप्रमाणे रोजगार मिळवित असतात. या शेतमजुरांचे मिळणारी मजुरी हे निर्वाहाचे एकमेव साधन असते. ब-याच वेळेला काम उपलब्ध नसल्यामुळे वा बिगर हंगामात या व्यक्तिना रोजगार मिळत नाही. त्यामुळे शेतमजुरांच्या या तीन प्रकारात भूहीन शेतमजुरांची आर्थिकस्थिती हलाखीची असते.

## शेतमजुरांची संख्या

ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी येथे शेतमजूर ही संस्था अस्तित्वात नव्हती. सर थॉमस मन्रो यांच्या म्हणण्याप्रमाणे १८४२ मध्ये भारतात एकही शेतमजूर नव्हता. ही जरी अतिशयोक्ती असली तरी याचा अर्थ त्यावेळी शेतमजूर अभावाने असत व त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी गंभीर नसे. १८८१ च्या खानेसुमारी प्रमाणे भारतात ७५ लक्ष शेतमजूर होते. १९२१ मध्ये त्यांची संख्या २ कोटी दहा लखापर्यंत वाढली.

..... ५/-

तक्ता १·१

भारतातील शेत मजुरांची संख्या :

| वर्षे | शेतमजुरांची संख्या (कोटीत) |
|---|---|
| १९५१ | २·७५ |
| १९६१ | ३·१५ |
| १९७१ | ४·७५ |
| १९८१ | ५·५४ |

तक्ता १·१ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून या तीस वर्षांत शेतमजुरांची संख्या दुप्पट झाल्याचे दिसून येते· मात्र ही आकडेवारीची यापेक्षा जास्त तुलना करता येण्याजोगी नाही· कारण प्रत्येक जनगणनेच्या वेळी शेतमजुराची व्याख्या बदलत गेली आहे· १९६१ ते १९८१ या कालावधीत शेतमजुरांच्या संख्येत दरसाल साधारणपणे १७ लाखांची भर पडत गेली· १९८१ नंतर दरवर्षी लोकसंख्या वाढत असल्यामुळे आणि लोकसंख्या वाढीत शेतमजुरांच्या कुटुंबातील जन्मदर जास्त असण्याची शक्यता असल्यामुळे गेल्या आठ वर्षांत शेतमजुरांच्या संख्येत बरीच भर पडली असणार·

ग्रामीण मजूर पहाणी समितीच्या अहवालात (१९६३-६५) असे म्हटले आहे की ग्रामीण कुटुंबांपैकी २२ टक्के कुटुंबे शेतमजुरांची आहेत· त्यापैकी ५६ टक्के कुटुंबे भूहीन आहेत· शेतमजुरांच्या कुटुंबांपैकी ४९·१ टक्के कुटुंबे अनुसुचित जाती व जमातींची आहेत· भूहीन व अल्पभूधारक शेतमजुरांपैकी ४३ टक्के श्रमिक स्त्रिया आहेत·

.... ६/-

शेतमजुरांमध्ये अशी विविधता असल्यामुळे कांही शेतमजुर मिळेल त्या मजुरीच्या दराला काम करावयास तयार असतात तर काही शेतमजुर, स्वत:च्या निर्वाहाचे काहीतरी साधन असल्यामुळे ठराविक मजुरीच्या दराखाली काम करावयास तयार नसतात. साधारणपणे पहिल्या गटात भूहीन - शेतमजूर, स्त्रिया व मुले यांचा समावेश होतो तर दुस-या गटात अल्पभूधारक व खंडकरी शेतमजुरांचा अंतर्भाव होतो. ग्रामीण मजूर पहाणी समितीच्या अहवालात साधारणपणे ६१ टक्के शेतमजूर कर्जबाजारी असतांत असे म्हटले आहे. त्यापैकी ५३ टक्के कर्जे खावटीची कर्जे असतात.

शेतमजुराना १९६४-६५ मध्ये सरासरीने वर्षभरात २७७ दिवस काम मिळत असे तर १९७४-७५ मध्ये त्याना वर्षभरात २५० दिवस काम मिळाले. म्हणजे या दशकात कामाच्या दिवसात ९.७५ टक्के इतकी घट झाली. या दशकात शेतमजुरांचे मजुरीचे मानही दररोज एक रुपयावरुन (१९६४-६५) ८८ पैशापर्यंत कमी झाले. म्हणजे मजुरीच्या दरात १२ टक्यांनी घट झाली. म्हणजे या दशकात शेतमजुरांचे दुहेरी नुकसान झाले,त्यांचे वार्षिक उत्पन्न घटले असणार, राहणीमान घटले असणार,कर्जबाजारीपणा वाढला - असणार. विशेष म्हणजे यानंतरच्या काळात सरकारी पातळीवर फारशी माहिती प्रसिध्दही करण्यात आली नाही.

१९५०-५१ साली शेतमजूर कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ४४७ रुपये होते ते १९५५-५६ मध्ये ४३७ रुपयांपर्यंत कमी झाले, ते १९६३-६४ मध्ये ६०० - रुपयांपर्यंत व १९७४-७५ साली १६७१ रुपयांपर्यंत वाढले. १९५०-५१ मध्ये दरडोई उत्पन्न ४६६ रुपये होते. म्हणजे शेतमजुराच्या कुटुंबाचे उत्पन्न दरडोई उत्पनापेक्षा कमी होते. १९७३-७४ मध्ये दरडोई उत्पन्न ६२१ रुपये झाले म्हणजे शेतमजूर कुटुंबाचे उत्पन्न त्यापेक्षा जवळजवळ १००० रुपयानी जास्त होते. येथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की ही तुलना दरडोई व दर कुटुंबी उत्पन्न यातील आहे. यावरुन शेतमजुराची दैन्यावस्था लक्षात येते.

....७/-

वैयक्तिकरित्या संशोधकानी गोळा केलेल्या आकडेवारीतून सुध्दा हीच परिस्थिती दिसून येते. श्री. सुनील धावन यांच्या सर्वेक्षणाप्रमाणे हरयाणामधील रोहटक जिल्ह्यात शेतमजुराला किमान वेतन दोन ते तीन रुपये व कमाल वेतन ४ ते ५ रुपये मिळते. हरयाणा राज्य हरीत क्रांतीच्या मूळ स्थानापैकी. तेथे आर्थिक सुबत्ताही आहे. तेथेच जर ही परिस्थिती होती तर इतर राज्यातील शेतमजुरांच्या हलाखीला पारावार नसणार. प्रा. प्रणाब बर्धन यांच्या म्हणण्याप्रमाणे १९६०-६१ ते १९६७-६८ या काळात शेती उत्पादन सहा टक्क्यानी वाढले पण शेतमजुरांच्या पदरात यातील काहीच लाभ पडला नाही. त्यामुळे पैशातील मजुरी तीच राहिली असली तरी वास्तव मजुरी कमी झाली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे केरळ राज्यात शेतमजुरांची एक जूट असल्यामुळे तेथील शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती बरी आहे.

शेतमजुरांची आर्थिक स्थिती खालावल्यामुळे त्यांचा कर्जबाजारीपणा वाढला. १९५०-५१ मध्ये दर शेतमजूर कुटुंबाचे कर्ज ४७ रुपये होते १९६४-६५ मध्ये ते १४८ रुपयांवर तर १९७४-७५ मध्ये ३८७ रुपयावर वाढले. या नंतरच्या काळात महागाई खूप वाढली, शेतीवरील अविवेकी यांत्रिकीकरणामुळे शेतमजुरामधील बेकारीही वाढली असणार व त्यामुळे शेतमजुरांच्या कर्जबाजारीपणात भर पडली असणार. दुर्दैवाने या बाबतीत अलीकडील व खात्रीलायक आकडेवारी उपलब्ध नाही.

या आर्थिक दुरावस्थामुळे शेतमजुरात वेठबिगारी चालते. भारतात वेठबिगारीत अडकलेले किती शेतमजूर होते या बद्दलच्या आकडेवारीत फार मोठी तफावत आढळते. राज्य सरकारानी पुरविलेल्या माहितीप्रमाणे १९७४-७५ मध्ये भारतात १.२० लक्ष वेठबिगार होते. राष्ट्रीय नमूना पहाणी मंडळाच्या ३२ व्या फेरीत गोळा केलेल्या आकडेवारी प्रमाणे ३.५ लक्ष वेठबिगार होते. तर राष्ट्रीय मजूर संस्थेच्या आकडेवारीप्रमाणे हा आकडा १९७८ मध्ये २२ लक्ष इतका होता.

....८-

## शेतमजुरांची परिस्थिती सुधारण्यासाठी

## सरकारने योजलेले उपाय

सन १९४८ पासून सरकारने अनेक प्रकारचे उपाय अंमलात आणले आहेत. दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती ही त्या उपायांची प्रमुख अंगे आहेत. हे उपाय असे आहेत.

१) किमान वेतन :-

१९४८ मध्ये भारत सरकारने किमान वेतनाचा कायदा मंजूर केला. व १९७४ मध्ये राज्य सरकारना शेतमजुरांचे किमान वेतन निश्चित करण्याचे आदेश दिले. या प्रमाणे महाराष्ट्र सरकारने विविध भौगोलिक - विभागांसाठी शेतमजुरांचे किमान वेतन निश्चित केले आहे. मोठ्या शेतक-यांचा राजकीय दबाव, शेतमजुरांची एकजूट नसणे, सरकारी अधिका-यांची उदासीनता व भ्रष्टाचार यामुळे शेतमजुराना प्रत्यक्षात किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळते. मात्र एक गोष्ट खरी की यामुळे किमान वेतनापेक्षा शेतमजुराना कमी वेतन मिळत असले तरी प्रत्यक्ष - मिळणा-या वेतनात वाढ झाली आहे.

२) जमिनीचे वाटप :-

शेतमजुराना विशेषत: भूहीनांना जमीन पुरविल्यास त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल या दृष्टीने वनविभागातील तसेच नवीन लागवडी खाली आणलेली जमीन भूहीन शेतमजुराना देण्यात येते. साधारणपणे एक लाख बत्तीस हजार हेक्टर जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच कुळकायदा अमलात आणून जमीनदारांकडील अतिरिक्त क्षेत्र कुळाना मालकीने देण्यात आले आहे. पण या दोन्ही बाबतीत प्रत्यक्ष

....९/-

कार्यवाहीत अनेक त्रुटी राहिल्यामुळे प्रत्यक्ष शेतमजुरांचा लाभ फारच अल्प झाला आहे. भूदान व ग्रामदानाच्या चळवळीतून उपलब्ध झालेली जमीनही शेतमजुराना अग्रक्रमाने देण्यात आली आहे.

३) शेतमजुरांच्या सहकारी संस्था :-

दुस-या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपासून शेतमजुरांच्या सहकारी संस्था स्थापन करून वनविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य विद्युत मंडळे, पाणी पुरवठा विभाग या सरकारी विभागाकडील कामे त्याना मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. बिगरहंगामातील काळातील कामे त्याना जास्त करून उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामुळे शेतीलाही मनुष्यबळाचा तुटवडा भासत नाही. शेतमजुरांच्या शोषणाचे प्रमाण कमी होते व त्यांच्या आमदनीत भर पडते.

४) वेठबिगारीचे निर्मूलन :-

ऑक्टोबर १९७५ मध्ये सरकारने एक परीपत्राक काढून वेठबिगारी हा गुन्हा ठरवून त्याला शिक्षा देण्याची तरतूद जाहीर केली. भारतीय संविधानात वेठबिगारी हा गुन्हा असल्याचे नोंदले गेले असले तरी त्याची अमलबजावणी होत नव्हती. १९७६ मध्ये या वटहुकूमाचे कायधात रूपांतर करण्यात आले. मार्च १९८६ अखेर २,०५,९२३ वेठबिगारांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. १९८५ मध्ये वेठबिगारांच्या पुनर्वसनासाठी १५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रत्येक वेटबिगार मजुराच्या पुनर्वसनासाठी मध्यवर्ती व राज्य सरकार समभागाने ४००० रूपये खर्च करतात. या योजनेखाली फक्त वेटबिगाराला स्वतंत्रपणे उत्पन्न मिळविता यावे म्हणून शेतीची औजारे, कुक्कुटपालन, मेंढी आणि वराहपालन या सारखे व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले जाते. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कौशल्याप्रमाणे स्वरोजगारही निवडण्याचे त्याला स्वातंत्र्य आहे.

५) वीस कलमी कार्यक्रम :-

दारिद्र्य निर्मुलन, कमाल जमीन कायद्याची कार्यक्षम अमलबजावणी, ग्रामीण भागातील लोकांचा कर्जबाजारीपणा कमी करणे, किमान वेतन कायदा व्यवस्थितपणे राबविणे, वेठबिगारांचे पुनर्वसन, गरीबांना - घरासाठी जागा देणे यासारखे कार्यक्रम अमलात आणण्यासाठी जुलै १९७५ मध्ये वीस कलमी कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली.

६) रोजगार व उत्पन्न पुरविणाऱ्या योजना :-

१९७०-७१ पासून अल्प व सीमांत भूधारक, की ज्यापैकी बहुतेकजण शेतमजुर असतात, याना उत्पन्नाचे जोड साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विकास यंत्रणा स्थापन करण्यात आल्या. पुढे या योजनांचे एकत्रीकरण करुन एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम अमलात आणला जाउ लागला. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या ग्रामीण व्यक्तिला २५ टक्के अनुदानावर उत्पन्न निर्मितीकरणारी जिंदगी प्राप्त करुन दिली जाते.

महाराष्ट्रात १९७७ पासून ग्रामीण विभागात बिगर हंगामात रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगारहमी योजना अमलात आणण्यात आली. शेतमजुराला पंचक्रोशीत काम उपलब्ध करुन देण्याची व काम उपलब्ध करुन देता न आल्यास बेकार भत्ता देण्याची जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारली आहे. रस्ते, ताली बांधणे, पाझर तलाव, सामाजिक वनीकरण यासारखे सामाजिक जिंदगी निर्माण करुन उत्पादक कार्याला चालना देणारे कार्यक्रम या योजनेखाली घेतले जातात.

शेतमजुराना या योजनांचा लाभ मिळून त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थती सुधारणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात तसे झालेले दिसून येत नाही. म्हणून त्यांची परिस्थिती जाणून घेण्याच्या मर्यादित हेतूने सदरचे सर्वेक्षण हाती घेतले आहे.